णयकोष

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. नं. ८६६

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८५०.

'फडें एडीटर' 'बगले वकील'
'फाटकी गोधडी' 'मारवाडी' वगैरे
कवितांचे कर्ते यांनीं रचलेलें
**नवीन काव्य.**

REFBK-0019501
REFBK-0019501

४ ॥
...ती ।
...हांसती ॥
...मला संशय ।

REFBK-0019501
REFBK-0019501

# [illegible]कोप.

([illegible]र्ध.)

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं० १२५०१

अतर्क्य महिमा तुझा सकल देव वा दानव ।
जयें सहज जिंकिले मग टिके कसा मानव ॥
सुधीर रणवीर हीर जन दीन केले जयें ।
अनङ्ग कविचीं हरो अखिल संकटें वा भयें ॥ १ ॥

सदैव किति कल्पना सुचति ग्रंथकारांसही ।
यदीय पदिं लीन हीन बहु दीन झाली मही ॥
स्वभावभिरु कामिनी रमणधीर केल्या जयें ।
अनङ्ग, कविचीं हरो सकल संकटें वा भयें ॥ २ ॥

करीन तरि काय मी ह्मणुनि पाहण्या लोभली ।
सखी मजवरी असे सहज एकदां क्षोभली ॥
तिला परिसवोनियां सुखविली जुन्या तत्कृती ।
वदा न गमते कुणा करियली अहो ती स्तुती ॥३॥

सुनील धन केश हे दिसति उत्पलांचे परी ।
प्रफुल्लकमलप्रभा विलसते कपोलांवरी ॥
विशाल तव भाल हें कमलपत्र भासे जणूं ।
सुरम्य अरविंदसें मुख तुझें कसें ना गणूं ॥ ४ ॥

तडागकमलें जशीं विकसलीं अशीं भासती ।
हरोनि कमला-द्युति जणुं तितें सुखें हांसती ॥
तयांत अति चंचल भ्रमर-हा मला संशय ।
न षट्पद, कनीनिका-कमल हें न, नेत्रद्वय ॥ ५ ॥

तुझी अमृतस्रग्विणी निशिदिनीं सखे वाणि ती ।
तृषार्त मम कर्ण हे पिउनि मानसीं वानिती ॥
सुधासम गिरा तुझी परिसुनी मुके कोकिल ।
सकंप तिजला करी तव कशास कोपानल ॥११॥

तुवां मजसि दृष्टितें चुकवुनी सदा पाहिलें ।
तुझे नयनबाणगे मज न ते कदां साहले ॥
सदैव तव हृद्गतें नयन बोलुनी दाविती ।
तयां कुपित होउनी करिसि रक्त आतां किती ॥१२॥

अगण्य गुण वर्णना करुं कसा सखे सांग मी ।
सरस्वतिचि वा बृहस्पतिचि बुद्धि वाटे कमी ॥
तुझ्या गुणसमुच्चयीं कधिंन दोष मी जाणला ।
कलंक विधुच्या प्रभे सहज कीं असे लोपला ॥१३॥

यदा वरुणसारथी रवि करी दिशा धूसर ।
तयास यदि अर्घ्य ते करुनि पूजिती भूसुर ॥
तुझीं नयनपंकजें उघडुनी तदा ऊठसी ।
मला न कळतां हळू शयनमंदिरा त्यागसी ॥१४॥

वडील जन भेटतां करिसि त्यां अर्धीं वंदन ।
अहा स्मरसि तूं सखे हृदयिं पार्वतीनंदन ॥
प्रभातविधि संपता तुलसि भक्तिनें पूजसी ।
अशी विनयखाणि तूं मजवरी च रागावसी ॥१५॥

तुझीं करसरोरुहें मम करामधें ठेउनी ।
सखे उपवनीं सदा बसतसें तुला घेउनी ॥
तशी फिरसि ठेउनी कर तुझा मम स्कंधिं तो ।
असह्य तव कोप त्या ह्मणुनियां पहा कांपतो ॥२१॥

असह्य नयनास उज्वलित दीप-राजी सती ।
किती लखलखे तिथें चहुंकडोनि आरास ती ॥
विचित्रित हि आसनें चतुरशीति भित्तीवरी ।
विलासनवमंदिरीं शयन मी करीं सत्वरी ॥ २२ ॥

शिरीष कुसुमावृता सखि अशा तुझ्या वेणिला ।
विषण्ण मनिं वासुकी अहह पाहुनी जाहला ॥
करीं क्वणति कंकणें, रुणति मेखला त्या कटीं ।
पदीं झुणति नूपुरें, दिससि तूं बरीं गोमटी ॥ २३ ॥

धृतातरल तारका गगन वस्त्र ती यामिनी ।
जणूं दिसत नेसली जलदवस्त्र सौदामिनी ॥
तशी दिससी नेसशी जरि तुं चांदण्या शालुसी ।
सखे मदनमंजरी मजवरी कसी कोपसी ॥ २४ ॥

अशी शयनमंदिरीं प्रगटसी सपंचारती ।
तुला बघुनि कां न त्या मदनवृत्ति संचारती ॥
तुझा उशिर पाहतां सुमनमंचकीं निद्रित ।
मला कुसुम मारुनी करिसी तूं तदा जागृत ॥२५॥

दा. क्र. १८५०१
ग्रंथालय
(स्थळ प्रत)

रवीकर मही, लता सरलवृक्ष आश्लेषती ।
समूह किती वीचिचे सतत सागरीं भेटती ॥
तसें तुजसि मी सखे हृदिं मदीय आंदोलिलें ।
कसें धडधडे तुझें हृदय आज कोपानलें ॥ ३१ ॥

तुझा पदर कञ्चुकीवर मुळीं नसे राहिला ।
दिसे नयनिं घूर्णिता सकल देह रोमाञ्चला ॥
प्रदिप्त मणिदीप तो विझविण्या तुझा फुंकर ।
प्रयत्न करि व्यर्थ वा वसन सांवराया कर ॥ ३२ ॥

नखक्षत कुचांवरी दिसत अर्ध चंद्राकृती ।
तुझे मिटत अर्ध नेत्र उठली मुखीं सीत्कृती ॥
द्विजांकुर तुझ्या तसे विलसलेच बिंबोधरीं ।
अगे सुरतचंद्रिके मजवरी न कोपा धरीं ॥ ३३ ॥

रतान्तसमयीं सखे गलितगात्र होसी यदा ।
कशी मिटुनि नेत्र गे पडसि पुष्पशेजीं तदा ॥
फुलें प्रसरलीं तसे विखुरले मुखीं केशही ।
नुरे मुळिच रंग तो अधरिं गालिंवा लेशही ॥ ३४ ॥

तुझी फिटलि कञ्चुकी गळुनी मेखला चालली ।
तुटे सकल हार मूक पदिं नूपुरें जाहलीं ॥
तदा कबरि ही सुटे पडत भार अंसांवरी ।
अगे शयनशोभिनी करि न कोप माझ्यावरी ॥ ३५ ॥

पहा असुनि दृष्टि ही दिसत मी खरा अंधसा ।
सुसंस्कृतगिरा मदीय न तिला उरे बंधसा ॥
अरुग्ण जरि कर्ण मी बधिर ऐकण्या जाहलों ।
सुमित्रगणिं बैसतां हृदयिं एकला राहिलों ॥ ४१ ॥

कटू सकल भोग ते विरह गे तुझा वाटवी ।
तसें श्वसित ऊष्ण गे रुधिर देहिचें आटवी ॥
अहा बघुनि कौमुदी तव सुहास्य मी आठवीं ।
तृषार्त तव दर्शना नयन अश्रुचे पाट वी ॥ ४२ ॥

शरीर मम तापलें ज्वरभरें पहा जेधवां ।
असह्य उठल्या किती शिरसि वेदना तेधवां ॥
तुझ्याविण तदा न ये जवळ आप्त कोणी सये ।
प्रसंग पडतां सखे कुणि न अन्य कामास ये ॥ ४३ ॥

द्विजांकरविं तूं किती करिसी चण्डी पारायण ।
किती नवस बोलसी-करिन सत्यनारायण ॥
करी कबुल कञ्चुकी वसन अम्बिकेला तदा ।
द्विजां अमित भोजनें-कशितरी टळो आपदा ॥ ४४ ॥

तुझ्या नवनिता परी सुमृदु अंकिं घे मच्छिर ।
*कुलङ्ग-जल-युक्त-वस्त्र वर राखिसी तत्पर ॥
कपोल तव शीतल प्रखर उष्ण गालीं मम ।
तुझा हि मग ठेविसी-सुखे मिळे न त्याचे सम ॥४५॥

रा-का०५
८८५

कसी रमविसी मुलें करुनि कागदी तारवें ।
किती बनविसी फुलें सुबक राघु वा पारवे ॥
अहा सुखविसी तयां कितिक देउनी कंदुक ।
सखे करिं तुवां दिली लटुपटूंचि ही बंदुक ॥ ५१ ॥

मुलींस किती बाहुल्या करुनि देऊनि रंजिसी ।
तयांस विणकामही शिवणकाम गे सांगसी ॥
पवित्र दमयंतिची सुरस ऐकवीसी कथा ।
तुझ्या जवळ बैसतां क्षण न एक जाई वृथा ॥ ५२ ॥

जयीं मधुर राधिका रमण कृष्ण लीलामृत ।
कितीक चरितें तशीं विमल साध्विचीं वर्णित ॥
अशीं शिकविलीं तुवां मुलिंस गाणिं गे सुस्वर ।
स्त्रिया सकल दीपती बघुनि मूर्ति ही भास्वर ॥५३॥

स्त्रियांस जमवोनि तूं कधिं न घोळ गे घालिसी ।
सुबोधयुत पुस्तकें बसुनि एकली वाचसी ॥
तसें शिवण काम गे सकल तूं करीसी स्वतां ।
प्रमोद मनिं दाटतो तव चरित्र हें पाहतां ॥ ५४ ॥

सुहास्य वदना तुझ्या बघुनि सर्व आनंदती ।
तुझी घडत संगती सुखद सान थोरांस ती ॥
उदात्त वचनें तुझ्या विसरती विपत्ती जन ।
कठोर मग कां असें मजवरी तुझें हें मन ॥ ५५ ॥

अतीथ गृहिं आलिया भृकुटि वक्र नोहे कदा ।
सुहास्य तव आस्य पाहुनि कशी उरे आपदा ॥
तयां सुरस भोजनें उचित मान देसी कसी ।
असें असुनि तूं सखे मजवरीच रागावसी ॥ ६१ ॥

कुणास दिधला शिधा, अमित दक्षिणा ती कुणा।
कुणास उरलें शिळें, वसन फाटकेंसें कुणा ॥
कुणास कधिं अंगडें, कधिं कुणास टोपी जुनी ।
सहाय सकलां तुझें घडतसे चहूं बाजुंनीं ॥ ६२ ॥

गुरांस जल वैरणें निशिदिनीं स्वतां घालिसी ।
तयांवरूनि मक्षिका निज करें कशी वारिसी ॥
करांत नव पल्लवी धरुनि वासरां चारिसी ॥
घरांत दुभतें तुझ्या विपुल नित्यशा राखिसी ॥ ६३ ॥

तुटोनि पडलें जरी नभ शिरीं उभा राहीन ।
दुभंग अवनी मला उदरिं घे तरीं जाइन ॥
जलप्रलयकाळिचें अनल वा सुखें चाहवे ।
परंतु तव कोप हा मज मुळीं न तो साहवे ॥ ६४ ॥

प्रसन्न सखि जाहली परिसुनी स्वतांची स्तुती ।
अहा हंसत येउनी जवळ बैसली ती सती ।
तुह्मा ठकविलें प्रिया करुनि कोप या रीतिनें ।
क्षमा करुनि दासिला अशिच वागवा प्रीतिनें ६५

अहो प्रियकरा ! वदा मजसि, काय माझा तरी ।
असेल अपराध आज घडला चुकोनी जरी ॥
तुह्मां विनवितें कृपाकरुनि जोडुनीयां करा ।
असे शरण मी तुह्मांस तरि कोप हा आवरा ॥६॥

कधीं भृकुटि वक्र ती करुनियां नसे पाहिलें ।
असें असुनि कां प्रिया मजसि आजहो लोटलें ॥
तुह्मां क्षणभरी सुचेन कधि काम माझ्याविणें ।
वृथा मजवरी असें प्रियकरा न रागावणें ॥ ७ ॥

सहस्र अपराध ते मजकडोनियां जाहले ।
सदैव गुण त्यांमधें हि तुह्मि नेहमीं पाहिले ॥
हळूच समजाविलें तव न कोपतां ही मला ।
असें असुनि आज कां मजवरी बरें कोपलां ॥८॥

प्रभात समयीं उठोनि मग शुद्ध झाल्यावरी ।
अगे तुळसि माउली मजसि देइं जन्मांतरीं ॥
असे पति-ह्मणोनि मी तिजपुढें धरी नम्रता ।
असें असुनि कां प्रिया मजवरी वृथा कोपतां ॥९॥

अपांग बघणें, तसें ठुमकणें, हळू बोलणें ।
गळ्यांत कर घालुनी सहज हांसणें, डोलणें ॥
जरा पदर सारणें, मुरडणें, स्त्रियांचीं जिथें ।
अशीं प्रखर आयुधें विफल कोपसीमा तिथें ॥१०॥

सुखें निशि बसोनि सौधशिखरीं नदीच्या तिरीं ।
शशांक-किरण-प्रभा अनुभवीत माडीवरी ॥
प्रसन्न मज होउनी दिधली आपुली मुद्रिका ।
करांगुलित घातलीत मम; साक्ष'ही चंद्रिका ॥१६॥

अहो पुरविलीत हौस मम देउनी वाञ्छिता ।
कधीं न कटुभाषणास मज योजिलें तत्वतां ॥
कदा न शिवला तुह्मां अजुनि कोप-मातंग तो ।
असें असुनि आज कां अहह एवढा राग तो ॥१७॥

करीं धरुनि घागरी उदक सिंचिता अंगणीं ।
कुणी जवळ नाहिंसें बघुनियां तुह्मी तत्क्षणीं ॥
हळू जवळ येउनी पद-रवास सांभाळिलें ।
करें मिटलिं पृष्ठतः सहज माझिं नेत्रोत्पलें ॥ १८॥

करास तुमच्या धरूनि वदलें, असे ठाउक ।
तुह्माविण शिवूं शके मज न अन्य, नाहीं चुक ॥
मला सहज ओढिली किपमि सांगण्याच्या मिषें ।
मनोदय न साधला ह्मणुनि कोपलां कीं कसें॥१९॥

उभी असुनि एकदां धवलवस्त्र मी नेसुनी ।
उमापतिस पूजुनी सकळ भूषणें लेउनी ॥
तुह्मीं सहज फेकिलें बकुल पुष्प अंगावरी ।
विनोद न रुचे मला तरिच राग माझ्यावरी ॥ २०॥

अहो जरि नणंद ती जवळ माझिया बैसली ।
तिचीं नयनपंकजें मिटुनियां मला चुंबिली ॥
किती खुणविलें मला परि कळे न मातें जरा ।
कृती तुमचि पूर्विंची उगि न कोपतां ती स्मरा २६

अहा प्रथम जेधवां बसत मी ऋतुस्नात ती ।
दिसे स्मित मुखावरी, सकल चेष्टुनी हांसती ॥
जणूं दिवस पातला सुखद मानसीं वांछित ।
स्मरा त्यजुनी कोप हा अधिक नाहिं मी बोलत २७

तुह्मा खचित आवडे शिकविणें मला वाचणें ।
विनोद करणें, सदैव मन मोकळें बोलणें ॥
सुनीतिपथ सांगणें, शिकविणें तसें वागणें ।
वृथा न अजि कोपणें चरणिं एवढें मागणें ॥ २८ ॥

कसा विषय तो असो कठिण शुष्क वा प्रेमळ ।
दुज्यां शिकविण्या तुह्मां खचित साधली ती कळ ॥
तुह्मी मधुर बोलुनी उतरितां मनीं इंगित ।
कसा न जडबुद्धि होय शिकुनी महापंडित ॥ २९ ॥

सुबोधवचनामृतप्लुतकथा सुरम्या किती ।
मला शिकविल्या तुह्मी करुनि यत्न नाहीं मिती ॥
स्त्रियांवर असे किती तरि जबाबदारी प्रिया ।
मला शिकवुनी अकारणच कोपलां कासया ॥ ३० ॥

दा. क्र. १९५०७

करोनि अति कष्ट ते पुरुष आणिती जें धन ।
अजाण कितिक स्त्रिया उधळिती विनाकारण ॥
कदापि अविचार हा मम करीं घडूं तो नये ।
हिशोब मज राखण्या शिकविलें तुह्मी हो स्वयें॥३६॥

मुलांस जरि शैशवीं घडत संगती आइची ।
सदा अनुकृती मुलें करिति काय तीं ना तिची ॥
स्त्रिया जर सुशिक्षिता सुगुण बालकांसी जडे ।
अशिक्षित हि आइचें विघडतें शिशू बापडें ॥ ३७ ॥

कळे न बहुत स्त्रिया भुळि च बालसंगोपन ।
शिशूंस जडती तरी विविध रोग ते काय न ॥
मला अमित औषधी शिकविल्या तशी शुश्रुषा ।
कशी करुनि राखणें सुदृढ बालकां नियशा ॥३८॥

उगाच मम वेळ जाउ न वृथा ह्मणोनी स्वतां ।
दिलें शिवण-यंत्र तें सुबकसें तुह्मी तत्वतां ॥
घरांत कपडे किती शिवुनि फायदा होतसे ।
अहो शिकविल्याविना युवतिनां कळावें कसें ॥३९॥

किती गळपटे नवे, कितिक अंगडीं टोपरीं ।
मुलांस झबलीं किती, कितिक पायमोजे तरी ॥
सुरेख विणकाम तें विविध जातिचें लोकरी ।
तुह्मीं शिकविलें मला करितसा जणूं नोकरी ॥४०॥

## वाचक अवश्य वाच!

अरसिकेषुं कवित्व निवेदनं ॥
शिरसि मा लिख मा लिख मा लिख ॥

प्रणयकोप हें नवीन प्रकारचें काव्य पाहून सबंध वाच-
पूर्वी ठाम मत ठोकून देण्याचे भरीस पडूं नको. आंत
ालेल्या शुद्ध शृंगारास दोषी ठरवून ढोंगी सभ्यपणाचा आव
ूं नको. भिन्न व्यक्तींचें विचारहि भिन्न असावयाचेच, हें
ांत ठेवून एखादी गोष्ट विरुद्ध वाटल्यास ती तुझ्या निंदेस
 आहे असें मात्र मानूं नको. मानवी कृति निर्दोष
लीच पाहिजे अशी खोटी कल्पना करून यांतील ऱ्हस्व
र्घादिक नजरचुका काढीत बसून वेळ फुकट घालवूं
ो. तूं टीकाकार असल्यास खऱ्या दोषाचें त्याप्रमा
ालवाचेंहि दिग्दर्शन कर, नाहींतर स्वतःचे अकुंचित मनाचें
ेल्या विचाराचें प्रदर्शन करण्याचें धाडस करूं नको.

कर्ता.